## निवासी स्थानिक विदेशी मुद्दा खाते –
## निवासी व्यक्तींसाठी सुविधा
## एपी ॲण्ड डीआय आर सिरिज परिपत्रक क्र. ५३(नोव्हेंबर २३, २००२)

भारतीय रिझर्व्ह बँक
विदेशी मुद्रा नियमन विभाग
केंद्रिय कार्यालय, मुंबई ४०० ००१

एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.५३

नोव्हेंबर २३, २००२

प्रति,
विदेशी चलनाचे सर्व अधिकृत विक्रेते,

प्रिय महोदया/महोदय,

**निवासी विदेशी मुद्रा (स्थानिक) खाते**
**निवासी व्यक्तींसाठी सुविधा**

अधिकृत विक्रेत्यांचे लक्ष एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.३७ नोव्हेंबर १, २००२ कडे वेधण्यात येत आहे ज्या अन्वये, सरकारने अधिसूचना प्रकाशित करण्यापूर्वी, निवासी विदेशी मुद्रा (स्थानिक) खात्यासाठी केलेला अर्ज, रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयाकडे पाठवणे त्यांच्यावर बंधनकारक आहे.

२. भारतीय रिझर्व्ह बँकेने, अधिसूचना क्र. फेमा/७४/२००२-आरबी. दिनांक नोव्हेंबर १, २००२ प्रकाशित केली आहे. त्यामुळे अधिसूचना क्र. दिनांक मे ३, २००० मध्ये बदल केला गेला आहे. या बदलामुळे भारतात निवासी असलेली व्यक्ती, अधिकृत विक्रेत्याकडे निवासी विदेशी मुद्रा (स्थानिक) या नावाचे खाते उघडून चालवू शकते. त्यात चलनी नोटा बँकेच्या नोटा व प्रवासी धनादेश यांनी रक्कम जमा करता येईल.

३. त्यामुळे अधिकृत विक्रेते आता भारतात निवासी व्यक्तींसाठी असे खाते उघडून ठेवू व चालवू शकतील. वरील अधिसूचना व एपी (डी आय आर सिरिज) परिपत्रक क्र.३७ च्या अटी व शर्ती खाली आवश्यक ते बदल, सूचना पत्र क्र. फेमा १०/२०००, आरबी, दिनांक मे ३, २००० मध्ये, सूचनापत्र क्र. फेमा ७४/२००२ - आरबी, दिनांक नोव्हेंबर १, २००२ प्रमाणे करण्यात यावेत.

४. अधिकृत विक्रेत्यांनी वरील माहिती,संबंधित खातेदारांना निदर्शनास आणावी.

५. या परिपत्रकातील निर्देश, फेमा १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १० (४) व कलम ११ (१)

आपला विश्वासू,

**ग्रेस कोशी**
मुख्य महा व्यवस्थापक

(विदेशी मुद्रा नियमन विभाग)
केंद्रीय कार्यालय , मुंबई - ४००००१

परिपत्रक फेमा ७४/२००२ आरबी

दिनांक नोव्हेंबर १, २००२

**विदेशी मुद्रा व्यवस्थापन ( भारतात निवासी व्यक्तींचे विदेश्ी मुद्रा खाते) (बदल) नियम, २००२**

फेमा १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम ९ चा खंड (बी) व कलम ४७ , चे उपकलम (२) च्या खंड (ई) अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, व फेमा १०/२००० - आरबी दिनांक मे ३, २००० मधील अंशतः बदलासाठी, भारतीय रिझर्व्ह बँक, विदेशी मुद्रा व्यवस्थापन (भारतातील रहिवासी व्यक्तीचे मुद्राखाते) विनियम, २००० मध्ये, खालील बदल करीत आहेः-

**१. संक्षिप्त शीर्षक व सुरुवात :-**

१.या नियमांना, विदेशी मुद्रा व्यवस्थापन (भारतातील रहिवासी व्यक्तींचे विदेशी मुद्रा खाते)(पाचवी दुरुस्ती) विनियम, २००० म्हणण्यात येईल.

२.हे विनियम, सरकारी राजपत्रात जाहीर झाल्यापासून लागू होतील.

**२. नियमातील बदलः-**

विदेशी मुद्रा व्यवस्थापन (भारतातील रहिवासी व्यक्तींचे विदेशी मुद्रा खाते) विनियम, २००० मध्ये, विनियम ५ नंतर तो विनियम खालीलप्रमाणे वाढविला जाईलः-

“**५ ए.** रहिवासी विदेशी मुद्रा (देशी) खाते उघडणे, ठेवणे व चालविणे

१.भारतात निवासी असलेली व्यक्ती, कोणत्याही अधिकृत विक्रेत्याकडे, विदेशी चलन खाते आणि प्रवासी धनादेश या स्वरुपातील विदेशी चलन जमा करुन, उघडून ठेवू न चालवू शकेल. मात्र वरील चलनी नोटा किंवा प्रवासी धनादेश, खालील प्रकारे मिळालेले असावेत.

अ) भारताबाहेर असतानां दिलेल्या सेवांचा मोबदलाः- या सेवा भारतातील उद्यम किंवा भारतात दिलेल्या नसाव्यात, किंवा

ब) भारतात निवासी नसलेल्या, पण भारतात प्रवासासाठी आलेल्या व्यक्तीने सेवेसाठी दिलेला मोबदला, भेट, मेहनताना किंवा वैध अशा देय बाबतीत दिलेले चलन, किंवा

क) भारताबाहेरील प्रवासात मिळालेला मेहनताना, किंवा भेट, किंवा भारताबाहेर जाताना , अधिकृत विक्रेत्याकडून घेतलेल्या विदेशी चलनातील शेष चलन

२. या खात्यावर, चालु खात्यावरील व्यवहारापेक्षाही देय असलेल्या रकमा, विदेशी मुद्रा व्यवस्थापन ( परवानगीप्राप्त भांडवली खात्यातील व्यवहार) विनियम, २००० च्या अंतर्गत येणाऱ्या भांडवली खाते व्यवहारासाठी नावे टाकता येतील.

३. हे खाते, चालु खाते समजण्यात येईल व त्यावर व्याज दिले जाणार नाही.

४. या खात्यावरील शिल्लक रक्कमेवर मर्यादा असणार नाहीत.

**सही/-**
**(के.जी.उदेशी)**
**कार्यकारी संचालक**